**प्रेस नोट दिनांक २०/०३/२०१९**

**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**"<u>तडीपार गुंड पोलीसांच्या ताब्यात</u>"**

तावरे कॉलनी,अरण्येश्वर पुणे परिसरात राहणारा व दत्तवाडी पोलीस स्टेशन, कोंढवा पोलीस स्टेशन, सिंहगड पोलीस स्टेशन या पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार शाहरुख वसीम खान, वय-२१ वर्षे याला मा.मंगेश शिंदे पोलीस उप आयुक्त सो. परि-३ पुणे यांनी दि.०३/१०/२०१८ रोजी पुणे शहर आयुक्तालय व जिल्हयातुन एक वर्षाकरीता तडीपार केले होते.

दि.१८/०३/२०१९ रोजी रात्री ०८/०० वा.च्या सुमारास दत्तवाडी पोलीस स्टेशनच्या तपास पथकातील पोलीस कर्मचारी विकास कदम यांना पेट्रोलींग दरम्यान अरण्येश्वर कमान,तावरे कॉलनी पुणे येथे मिळुन आल्याने त्यांनी त्यास ताब्यात घेवुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे त्याने तडीपारी काळा मध्ये कोणत्याही सक्षम अधिका-याची पुर्व परवानगी न घेता विनापरवाना पुणे शहरात मिळुन आल्याने त्याच्या विरुद्ध फिर्याद दिली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास देविदास घेवारे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवा.५५२८ फुलपगारे हे करत आहेत.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.